दि.कि.अर्ज क्र. **२४६/२०२३**
लता वि. सुरेश व ईतर
नि.क्र. ०/३५

नि.क्र. ०/३५

**<u>दिनांक १३.०३.२०२५</u>**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची उलटतपासणी गैरअर्जदार क्र.१, २/१ ते २/३, ४/१ तर्फे विद्वान वकील श्री. एस. ए. फडणीस यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरू :–</u>**

५. हे म्हणणे खरे आहे की, मी याकामी सर्वअधिकार पत्रासाठी स्वत: स्टॅम्प घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या स्टॅम्पपेपर मुद्राक विकत घेणार म्हणून माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी स्टॅम्प पेपर विकत घेतला त्या वेळी अर्जदार त्या ठिकाणी हजर नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी कशासाठी स्टॅम्प पेपर विकत घेत आहे याबाबतची कल्पना अर्जदार हिला नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, कुलमुख्यत्यार पत्रावर अर्जदारच्या अंगठया ठसाच्या बाजूला साक्षीदार साजीदा हिने अंगठा माझ्या समक्ष केला आहे म्हणून सही केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: वकिली केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कुलमुख्यत्यार पत्राचा नोटरी दस्त बनवला त्यावेळेस नोटरीसमक्ष अर्जदार हजर नव्हती म्हणून नोटरी यांनी माझ्या समक्ष अर्जदारने अंगठा केला आहे म्हणून साक्षीदार साजेदा हिची सही घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिने माझ्या हक्कामध्ये असा कोणताही दस्त करुन दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावरील सहया किंवा अंगठे अर्जदार हिचे नाहीत.

६. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०८.०७.२०२२ रोजी सदर स्टॅम्प पेपर खरेदी केला होता. हे म्हणण खरे आहे की, त्यानंतर दिनांक ०२.०८.२०२२ रोजी मी सदर स्टॅम्प पेपर वर कुलमुख्यत्यारपत्र तयार करुन घेतले. त्याचे कारण अर्जदार ही अजारी असल्याने सदरचे दस्त नोटरीला देवून बनवून घेतले. त्याबाबतचे कारण अर्जामध्ये व कुलमुख्यत्यारपत्रामध्ये लिहलेले आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी विधिज्ञ श्री. एम. डी. बिराजदार यांच्यासमक्ष शपथपत्र तयार केले त्यावेळेस देखील अर्जदार त्या ठिकाणी हजर नव्हती. हे

दि.कि.अर्ज क्र. **२४६/२०२३**
लता वि. सुरेश व ईतर
नि.क्र. ०/३५

म्हणणे खरे नाही की, त्यांच्या समक्ष दुसरी महिला उभी करुन ती अर्जदार आहे असे भासवून मी त्यांची दिशाभूल करुन खोटे शपथपत्र बनवून घेतले.

८. मी घर मिळकतीचे सन २०१३ पुर्वीचे अभिलेख पाहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४.०२.२०१० रोजी माझ्या सास–यांनी सदर मिळकत गैरअर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.४/१ यांच्यामध्ये वाटून दिली. तसा लेखी वाटणीचा दस्त मयत माझ्या सास–यांनी गैरअर्जदार क्र.१ व ४/१ यांच्या नांवे करुन दिलेला आहे किंवा नाही याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुख्याधिकारी नगरपरिषद यांच्या दिनांक ३१.०३.२०११ च्या आदेशाप्रमाणे वाटणीपत्रानुसार गैरअर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.४/१ यांची नांवे घर मिळकतीला लावण्यात आलेली आहेत. हे म्हणणे खेरे आहे की, त्या आदेशानुसार घर मिळकतीच्या ८–अ च्या उता–याला गैरअर्जदार क्र.१ व ४/१ यांची नांवे आजही कायम आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा आदेश व ८–अ च्या उता–या विरुध्द उजर दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ व ४/१ हे माझे सासरे वारल्यापासून मी अर्जात नमूद केलेल्या मिळकतीवर काबीज आहेत.

९. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१.०३.२०११ च्या आदेशाप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ व ४/१ यांच्यामध्ये मिळकतीच्या वाटणीअनुसार स्वतंत्र ८–अ उतारे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार गैरअर्जदार क्र.१ यांच्या मिळकतीचे क्र.W4/Z3/MR/000576 व त्याचा जुना मालमत्ता क्र.४–५७२ आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच गैरअर्जदार क्र.४/१ हिच्या नावे नविन मालमत्ता क्र.W4/Z3/MR/000568 व जुना मालमत्ता क्र. ४–५७३ आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ८–अ च्या उता–यानुसार गैरअर्जदार क्र.१ व ४/१ सन २०१० पासून सदर मिळकतीवर मालक या नात्याने काबीज आहेत.

१०.  सदरचा अर्ज दाखल करण्यापुर्वी माझे सासरे हयात असतांना मी किंवा ईतर गैरअर्जदार यांनी मिळकतीमध्ये हिस्स्यासाठी मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे हयात असतांना गैरअर्जदार क्र.४/१ हिने त्यांची सेवा केली असल्याने माझ्या सास–यांनी दिनांक २४.०२.२०१० रोजी वाटणीपत्रा अधारे गैरअर्जदार क्र.४/१ हिच्या नावे मिळकत अर्जदाराच्या समक्ष वाटणी करुन दिली. त्यामुळे अर्जदाराने तशी कोणतीही मिळकतीमध्ये हिस्स्याची मागणी केली नाही.

११.  हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास–यांनी त्यांच्या हयातीमध्ये गैरअर्जदार क्र.१ व ४/१ यांना मिळकत वाटणी करुन दिली आहे त्यामुळे मयत सास–यांच्या नावे कोणतीही मिळकत उरली नसल्याने मला सदरचा अर्ज करण्याचा अधिकार नाही. मी दिनांक २४.०२.२०१० रोजी च्या वाटणीपत्राला अव्हानीत केलेले नाही. मालमत्तेच्या ८–अ च्या उतार–यावर गैरअर्जदार १ व ४/१ यांची खोटी नावे नमूद केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी मयत बळवंत सुर्यवंशी यांचा जावाई असल्याने त्यांनी त्यांची मालमत्ता कुठे व कशी वाटप केली याबद्दल मला कसलीच माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार यांची मानसिक स्थिती ब्रेन हॅमरेज झाल्यामुळे चांगली नसल्यामुळे त्यांना त्यांच्या सहया मी कुठे घेत आहे याबाबत त्यांना कळत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ व ४/१ यांच्या नावांच्या मिळकतीला आज खुप बाजार भाव असल्याने त्या मिळकतीमध्ये मला काही हिस्सा मिळावा म्हणून मी हा अर्ज केला आहे. हे म्हणणो खरे नाही की, सदर अर्ज दाखल करण्यापुर्वी मी अर्जामध्ये नमूद मिळकती संदर्भात कागदपत्राची पाहाणी व शहनिशा न करता अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिची मिळकतीमध्ये हिस्सा मागण्याची कुठलीही इच्छा नसतांना मी अर्जदार हिचे खोटे अधिकारपत्राअन्वये खोटा अर्ज तयार करुन दाखल केला आहे.

१२.  मयत बळवंत सुर्यवंशी यांच्या नावे ईतर मिळकती नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की,

दि.कि.अर्ज क्र. **२४६/२०२३**

लता वि. सुरेश व ईतर

नि.क्र. ०/३५

सदरची मालमत्ता हडप करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण. फेर तपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by Parvez Isahaquekhan Mokashi
Date: 2025.03.15 11:23:34 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–१३.०३.२०२५. दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.